



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६८०. वा | रविवार | दि. ११ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# राज्यात गुंडागर्दी सुरू, मुंबई अदानींच्या शिखात घालण्याचा प्रयत्न; उद्धव ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल...

वृत्तसंस्था/मुंबई

सरकारच्या विरोधात सर्वत्र असंतोष आहे. मात्र धारावीत असंतोष जास्त आहे. मी तुमच्यासाठी लढायला उतरलो आहे. तुम्ही सोबत राहणार आहात की नाही, असा सवाल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी धारावीकरांना विचारला आहे. ते आज धारावीत बोलत होते. यावेळी उद्धव ठाकरेंनी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. राज्यात गुंडागर्दी वाढत असल्याचे वक्तव्य त्यांनी यावेळी केले आहे. दरम्यान उद्धव ठाकरे आज धारावीत आले होते. त्यांनी आज धारावीकरांसोबत संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, विरोधकांच्या मागे काही लावून द्यायचं आणि त्यांना फोडून आपल्या पक्षात घ्यायचं. आपल्यातील नाही मात्र इथले तिथले काही लोक त्यांच्यात गेले आहेत. विकाऊ माल विकला गेला हरकत नाही. मात्र माझे निष्ठावंत मावळे माझ्यासोबत आहेत तोपर्यंत चिंता नाही. त्यामुळे आम्ही जिंकणार म्हणजे जिंकणारच.ते पुढे म्हणाले की, मोर्चा काढला तेव्हाच मी बोललो होतो. धारावीकरांना तात्पुरती व्यवस्था म्हणून इथून उचलतील आणि मिठागरात नेऊन टाकतील. तेव्हा निर्णय झालेला नव्हता. सरकारमधील काही लोक बोलले की असं काही होणार नाही. उध्दव ठाकरे हे असंच काही बोलत आहेत. मात्र काही दिवसांपूर्वी जागा कोणी मागितली? आपण मुंबईकरांसाठी कांजूरमार्गाची जागा मागत होत. तेव्हा केंद्र सरकार कोर्टात गेलं होतं. जेव्हा जागा मागत होतो, तेव्हा दिली नाही. मात्र आता पंतप्रधानांच्या मित्रासाठी म्हणजे अदानींसाठी मुलुंडची जागा दिली आहे. साथ सगळ्यांची हवी मात्र विकास फक्त माझ्या मित्रांचा व्हावा, असं त्यांना वाटतं. मात्र मी असं होऊ देणार नाही. माझ्या धारावीकरांना विकास हवा तो पण इथेच हवा, अशा शब्दात ठाकरेंनी भाजपला सुनावलं आहे. ठाकरे म्हणाले की, तुम्हाला असं वाटत असेल तर घरं बांधेपर्यंत दिली मिठागरात जागा मात्र तुम्ही एकदा मिठागरात गेलात तर तुम्हाला पुन्हा धारावी दिसणार नाही. कारण ही अदानींच्या घशात घातली जात आहे. नंतर जागा तर गेलीच आणि मिठागरही गेलं असं होईल, असं उद्धव ठाकरेंनी धारावीकरांना सांगितलं.ठाकरे म्हणाले की, या धारावीत तुम्ही पिढ्यानपिढ्या राहत आहात. जेव्हा तुमच्यावर संकट आलं होतं. तेव्हा तुमच्या मदतीला कोण आलं होतं का? पंतप्रधान आणि अदानी आले होते का? मात्र आता दिसतील. आता कोरोना नाही आहे. माझ्या धारावीकरांना ५०० फुटांचं घर मिळालं पाहिजे, ही आमची पहिली मागणी आहे. इथे कोंडवारा करुन इथल्या लोकांना मिठागरात फेकायचं. तसेच



इथे उपऱ्यांची वस्ती बसवणार असाल आणि सगळा पैसा जर अदानींच्या खिशात घालणार असाल तर माझ्या धारावीकरांनी काय पाप केलं आहे, असा सवाल ठाकरेंनी सरकारला विचारला आहे.धारावीककरांनी काही गुन्हा केला नाही. इतके वर्ष जिथे राहिले ती धारावी आधी कशी होती, आताही कशी आहे? आता धारावीला सोन्याची किंमत आली आहे. मात्र मुंबईतून उद्योगधंदे घेऊन जात आहे. डायमंड मार्केट घेऊन गेले. आणखी काही घेऊन गेले. मात्र हेही त्यांना कमी पडतयं म्हणून पूर्ण मुंबई अदानींच्या खिशात घालायला निघाले आहे. जो काही टेंडरचा घोळ झाला तो तुम्हाला माहित आहे. आपलीच लोक घुसवून कसा अदानींना फायदा होईल हे पाहून टेंडर देऊन टाकायचं, अशा कठोर शब्दात ठाकरेंनी टीका केली आहे.

# दारूसाठी पैसे न दिल्यामुळे आईचा चाकूने भोसकून खून...


## भावालाही केली मारहाण : आरोपीस पोलिसांनी केली अटक

जनसंचलन/ डोणगाव

दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने आईवरच चाकूने प्राणघातक हल्ला केल्याची घटना ८ फेब्रुवारी रोजी डोणगाव येथे घडली. या प्रकरणी आरोपी मुलास पोलिसांनी ९ फेब्रुवारीला रात्री साडेअकराच्या सुमारास अटक केली आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या चंद्रभागाबाई प्रल्हाद भुतेकर यांचा १० फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार डोणगाव येथील आरोपी किरण प्रल्हाद भुतेकर याला दारू पिण्याचे व्यसन असून, ८ फेब्रुवारी रोजी त्याने आई चंद्रभागाबाई प्रल्हाद भुतेकर (वय ६८) यांना दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केल्याचे तक्रारीत नमुद आहे. पैसे देण्यास नकार दिल्याने किरण भुतेकर याने आईवर चाकूने वार केले. यामध्ये चंद्रभागाबाई भुतेकर गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरु असताना १० फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला आहे.




आईला का मारले, अशी विचारणा करणाऱ्या माधव भुतेकर यांनाही किरण भुतेकर याने मारहाण केली. या प्रकरणी डोणगाव पोलिसांनी आरोपी किरण भुतेकर याच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे.



# सद्भावना सेवा समितीच्या वतीने कथा सप्ताह....

# आईचे हृदय ईश्वराचे निवास स्थान आहे...- सुश्री प्रियंकाजी



जनसंचलन/बुलढाणा

मातृत्वाची मला महती आजच्या पुष्पामध्ये विवाद केली. आई चार चार मुल उहानपणापासून सांभाळते पण चार मुलं मिळून आई वडीलांना सांभाळू शकत नाही ,सर्व त्रास सहन करून मरणप्राय यातना सहन करते व मुलांना जन्म देते, संततीने चामड्याचे बुट करुन आई वडीलांना घातले तरी ऋण फेडल्या जाणार नाही. आईचे हृदय हे इश्वराचे निवासस्थान आहे, ते हृदय दुःखविले तर ईश्वर क्षमा करणार नाही असे प्रतिपादन सुश्री प्रियंकाजी यांनी भागवत कथेचे तृतीय पुष्प गुंफताना काढले. अनेक उदाहरणे देऊन मातृत्वाची महती स्पष्ट देखी. ओ मां, मेरी प्यारी प्यारी मा हे भजन म्हटले तेव्हा प्रियंकाजी आणी मंडपातील सर्व महिषांच्या डोळ्यात अश्रू होते व रडताना दिसत होते. कुभेच्या सुरुवातीला डॉ शर्मा, ही चौथमल कुमावत, अमीत् काळकर यांनी ग्रंथाचे पूजन केले व माल्यार्पण केले. सौ. संजूदेवी कुमावत, सौ. भावना काळकर, मंजू शर्मा, मीना मिश्रा यांनी पूजन व आरती केली. परशुराम समाज महिला मंडळाच्या सर्व महिलांनी व्यास पिठासमोर आरती केली. आजच्या दिवसाची जबाबदारी परशुराम ब्राम्हण समाज महिला मंडळाकडे होती. व्यासपीठ, सजावट, रांगोळी, आरती तयारी, स्वागत सर्व कार्ये पार पाडली. या वेळी मंडळाने अकरा हजार रुपयाची देणगी दिली. प्रसाद वितरण माहेश्वरी समाज महिला मंडळाने केली. शिव विवाहा- प्रित्यर्थ चंद्रशेखर माळी मामा यांनी बुंदीचा प्रसाद दिला. सायंकाळीन आरती मध्ये मुख्य यजमान दैनिक यजमान उत्सव यजमाना सोबत गीता शर्मा, अक्षता शर्मा सह रमेश पंजाबी, प्रविण कालावाडीया, राजेश गवली, डॉ. पवन बजाज, रतनलाल तापडीया, चंद्रशेखर माळी मामा, राधेशाम धनेखा, घनशाम चोपडा, गायत्री परिवार यांनी स्वागत व आरती केली. परशुराम ब्राम्हण समाज महिला मंडळाने वीस मीनीटाचे नृत्य व झाकी सादर केत्री. मंडपातील सर्व श्रोत्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. नृत्यामध्ये सौ. मनिषा शर्मा, गीता शर्मा, मिना शर्मा, मेघा कपुर, अनामिका शर्मा, शितल शर्मा, अक्षरा शर्मा, मंजु शर्मा, अर्चना वैष्णव, अंजली परांजपे, वैशाखी जोशी, अक्षता पुरोहित आणि शिवाच्या देशात सिध्दी जोशी, रुचिका वैष्णव पार्वतीच्या वेशात झाकी सादर केली . आजचा प्रसंग शिव विवाह, ध्रुव चिरित्र व सती चरीत्र सतीचा होता. या प्रियंकाजी कथेत पुढे म्हणाल्या ङ्कङ्कजे दुःख भी सहन केले ते माझ्या मुलांच्या वाट्याला येऊ नये असे प्रत्येक आई ईश्वराजवळ प्रार्थना कुरते. मुलींचा जन्म सौभाग्याने होतो. कन्या माहेर व सासर दोन्हीला प्रसन्न ठेवण्याचा प्रसन्न करते. संस्कार करते, भक्ताची आराधना भोलेनाथ लवकर स्विकारतात. ज्यांना आई आहे ते भाग्यशाली आहेत असे उद्गार के प्रियंकाजी यांनी काढले. अंधारातून प्रकाशाकडे नेतो तो गुरु, प्रथम गुरु आई असते असे मत मांडले आणि भारत मातेचं वर्णन भजनातून सादर केले. जहा डाल डाल पर चिडीया करती बसेरा हे गीत गायल्यावर मंडपात देशभक्तीपर वातावरण तयार झाले. भोजन व्यवस्था गिरधारी शर्मा, सांभाळत आहे. समितीचे सर्व पदाधिकारी, व कार्यकर्ते कथा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# भगवान प्रभु श्री विश्वकर्मा यांच्या जयंतीनिमित्त सुतार समाज बांधवाची बैठक संपन्न



जनसंचलन/बुलढाणा

सृष्टीचे निर्माते भगवान प्रभु श्री विश्वकर्मा यांची दि २२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जयंती निमित्त आज दि १० फेब्रुवारी रोजी सागवन रोडवरील ऋषीफर्निचर गजानन बोराडे यांच्या येथे सुतार समाजाच्या वतीने बैठक घेण्यात आली आहे.या बैठकीला सुतार बांधव मोठ्या संख्याने उपस्थितीत होते.२२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जयंती निमित्त आढावा बैठक घेण्यात आलीआहे.कार्यक्रमाची रूपरेषा कशी असणार यांची माहिती या बैठकीत देण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा मोठ्या उत्साहात प्रभु श्री विश्वकर्मा यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे.या वर्षी चिखली रोडवरील येळगाव जवळ असलेल्या दामोधर महाराज आश्रम येथे प्रभु श्री विश्वकर्मा यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे.प्रभु श्री विश्वकर्मा यांची आरती करून तसेच भजनी मंडळीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महाप्रसादाचे आयोजन सुध्दा करण्यात आले आहे.सकाळपासून विविध कार्यक्रमला सुरूवात राहणार आहे.त्यामुळे या वर्षी मोठ्या उत्साहात तसेच थाटामाटात हि प्रभु श्री विश्वकर्मा महाराज यांची जयंती साजरी करायची आहे. त्यामुळे जास्तीत जास्त सुतार समाज बांधवानी तसेच माता भगिनींनी उपस्थितीत राहावे असे आवाहन सुतार समाज बांधवाच्या वतीने करण्यात आले आहे.यावेळी बैठकीला बुलढाणा जिल्हा विश्वकर्मा सुतार समाज एकीकरण समितीचे अध्यक्ष डॉ विजय खोलाडे,गजानन बोराडे,विश्वकर्मा महिला अर्बनचे अध्यक्ष समाधान सुरोशे, विकास खानजोडे,राम सोनुने,प्रभाकर सन्नासे,अनिकेत खानजोडे,पत्रकार अजय राजगुरे, अरूण जाधव, अंकुश बोराडे,अमोल खोलगाडे,अनिकेत खानजोडे,आदी लोक उपस्थितीत होते.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | गुंतवणुक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ७.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.५०% | ७.५०% |
| ३ | १८१ दिवस ते १६ महिने | | ८.००% | ८.००% |
| ४ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ७.००% |
| ५ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ६ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |
| ७ | सुकन्या लक्षाधिश ठेव योजना | | ८.७०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर ०.२५% टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विनायक भाग्यवंत यांचीभारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती...

जनसंचलन/बुलढाणा

विनायक भाग्यवंत यांचे गेल्या १०-१२ वर्षा पासून चे पक्षाप्रती असलेले कार्य व निष्ठा लाक्षात घेता तसेच आगामी काळात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी त्यांच्यावर भारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. विनायक भाग्यावंत यांनी या आधी भारतीय जनता युवा मोर्चा शहर अध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष पदी चांगल्या पूर्ण ताकदीनिशी पक्ष निष्ठतेने पक्षा साठी काम केले आहे. भाजपाचे विचार जिल्हाभर घरो घरी पोचवून लोकसभेसाठी पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांचे हात बळकट करणार असल्याचे सांगितले तसेच लवकरच जिल्ह्याची जंबो कार्यकारणी गठीत करणार असून जास्तीत जास्त जिल्हाभर युवकांचा युवा मोर्चामध्ये प्रवेश घेणार असल्याचे त्यांनी सांगितले माझ्यासारख्या कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसणाऱ्या सामान्य कुटुंबातील युवकावर जिल्हाध्यक्ष पदाची कमान सोपवली आणि हे फक्त भारतीय जनता पक्षा मध्येच होऊ शकत या पक्षात कर्तृत्व व निष्ठेला महत्व दिले घराणे शाहीला कुठेही थारा नाही जबाबदारी



नक्कीच मोठी असून त्याला पुरेपूर सन्मान मिळवून देण्याचा माझा मानस राहील असे विनायक भाग्यवंत यांनी सांगितले त्यांच्या निवडीचे सर्व जिल्हाभरातून व स्तरातून स्वागत व शुभेच्छा वर्षाव होत आहे.

# रास्त भाव दुकान परवान्यासाठी जाहीरनामा प्रसिद्ध...

जनसंचलन/बुलडाणा

जिल्ह्यातील रिक्त असलेल्या ठिकाणी नव्याने रास्त भाव दुकाने परवाना मंजूर करण्यासाठी जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून संबंधित गावात जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. शासनाच्या निर्णयानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार नवीन रास्त भाव दुकान परवाने प्राथम्यानुसार मंजूर करण्यात येणार आहेत. यात पंचायतमध्ये ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था, नोंदणीकृत स्वयं सहायता बचत गट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था, महिला स्वयं सहायता बचत गअ व महिलांच्या सहकारी संस्थांचा समावेश आहे. बुलडाणा तालुक्यात बुलडाणा, दत्तपूर, चिखली तालुक्यात अमडापूर, सावरखेड बु., वाघापूर, सिंदखेड राजा तालुक्यात सोनोशी, बाळसमुद्र, देऊळगाव राजा तालुक्यात दिग्रस बु. देऊळगाव राजा येथे दोन, मेहकर तालुक्यात वडाळी, नानज, मोताळा तालुक्यात सांगळद, चिंचखेड खुर्द, डिडोळा खुर्द, शेगाव तालुक्यात महागाव, सांगवा, नांदुरा तालुक्यात दहिवडी, अंबोड, सावरगाव चाहू, भुईशेंगा, इसबपूर, नारायणपूर, रोटी, खातखेड, पिंपळखुटा खुर्द, जिगाव, हिंगणाभोटा, जळगाव जमोद तालुक्यात पळसखेड, आडोळ खुर्द, उसरा खुर्द, निमकराड, ईस्लामपूर, खामगाव तालुक्यात खामगाव येथे आठ, पिंपळगाव राजा, उमरा लासुरा, आमसरी, कुऱ्हा, मांडणी, शेंद्री, धापटी, चिखली खुर्द, नागझरी खुर्द, संग्रामपूर तालुक्यात सावळा, मारोड, दानापूर, इटखेड, शेवगा खुर्द, खळद, पंचाळा बु., हिंगणा कवठळ, भोन, धामनगाव, मनार्डी, निमखेड, लोणार तालुक्यात गुंधा, पिंपळनेर, लोणार, मलकापूर तालुक्यात पिंपळखुटा बु., लासुरा येथे येथे नवीन रास्तदुकान परवाना मंजूर करण्यात येणार आहे, असे जिल्हा पुरवठा अधिकारी आर. एम. बसैय्ये यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी महावितरण विभागास दिले निवेदन...

जनसंचलन/बुलडाणा

महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटनेच्या वतीने महावितरण विभागात विविध मागण्यांसाठी निवेदन देण्यात आले आहे. महानिर्मिती, महावितरण, आणि महापारेषण या तिन्ही वीज कंपन्यातील सर्व कंत्राटी कामगार हे अनुभवी व कुशल असून ते मागील १५ ते २० वर्षापासून काम करीत आहे अशा सर्व वीज कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्या आजपर्यंत अनेक संघटनांनी शासन व प्रशासन दरबारी मांडल्या आहे मात्र या कामगारांना अद्याप रास्ता न्याय मिळालेला नाही. त्यामुळे राज्यातील तिन्ही वीज कंपनीत कार्यरत विविध कंत्राटी कामगारांच्या सर्व संघटना प्रामुख्याने एकत्र येऊन महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती २०२४ स्थापन केले असून त्यांच्या वतीने विविध मागण्यांसाठी महावितरण विभागास निवेदन देण्यात आलेले आहे. तिन्ही कंपनीतील सर्व वीज कंत्राटी कामगारांना आज रोजी मिळत असलेले एकूण पगारात बेसिक पूरक भत्ता दिनांक १ एप्रिल २०२३ पासून मागील सर्व फरकासह ३०% वेतनात वाढ करून देण्यात यावी. तिन्ही वीज कंपनीतील मधुर नियमित रिक्त पदावर व गरजेनुसार काम करत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना नियमित सेवेत सामावून घ्यावे त्यांना नोकरीत सामावून घेईपर्यंत तिन्ही कंपनीमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येऊ नये. या भरतीला ऊर्जामंत्री यांनी तातडीने स्थगिती देऊन खाजगीकरणाच्या संपाच्या वेळी ऊर्जामंत्री यांनी दिनांक ४ जानेवारी २०२३ रोजी सह्याद्री शासकीय निवासस्थानी सर्व कायम



व कंत्राटी कामगार संघटनेच्या सोबत घेतलेल्या बैठकीत जाहीर केलेल्या निर्णयानुसार तिन्ही कंपन्यात भरती प्रक्रिया राबवताना सर्व अनुभवी व कुशल कंत्राटी कामगारांना वयोमर्यादित सूट द्यावी रानडे समितीच्या शिफारसीनुसार यांना विशेष आरक्षण द्यावे तसेच चिनी वीज कंपन्यांमध्ये भरतीसाठी वयोमर्यादा ही समान असावी व कंत्राटी कामगारांना या भरतीमध्ये प्राधान्य द्यावे अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आलेले आहे.

# वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन




जनसंचलन /बुलढाणा

जिल्हा परिषद सेस अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना थेट हस्तांतरणद्वारे अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे जिल्हा परिषद सेस २०२३-२४ या वर्षामध्ये जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिला आणि मुली यांचे यांचे करिता वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ थेट हस्तांतरण द्यावयाचा आहे. त्यासाठी लाभार्थी हिस्सा १० टक्के व ९० टक्के शासकीय अनुदान आहे. यासाठी दि. २२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहे. यात ग्रामीण भागातील अपंग महिला व अपंग मुलींना पिठाची चक्की पुरविणे, ग्रामीण भागातील महिला व मुलींना पिको व फॉल मशिन पुरविणे या योजनांचा समावेश आहे. सदर योजनांचे अर्ज तालुक्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयात उपलब्ध आहेत. लाभार्थी यांनी आवश्यक कागदपत्रासह, तसेच अटी व शर्तीसह अर्ज भरून द्यावे. अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेल्यास आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला प्राधान्य राहणार आहे. योजनाशी संबधित अर्ज, तसेच अटी व शर्ती कार्यालय, तसेच प्रत्येक तालुक्यातील सर्व बालविकास प्रकल्प कार्यालय व zpbuldhana.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविले आहे.

# शेगावात भरदिवसा घरफोडी; अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा...

जनसंचलन/ शेगाव

भर दिवसा घर फोडून अज्ञात चोरट्याने एक लाखाचे दागिने लंपास केल्याची घटना ८ फेब्रुवारी रोजी शहरातील मानेनगर भागात उघडकीस आली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेगाव शहरात दिवसेंदिवस चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मानेनगरातील शिक्षक देवलाल जगदेव लांडे हे बाहेरगावी नोकरी करतात. दररोज ते घराला कुलुप लावून जातात. या संधीचा फायदा घेत त्यांच्या घरावर पाळत ठेवून ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. अलमारीमध्ये ठेवलेले २४ हजार रुपये रोख व दागिने असा एकूण १ लाख ५ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला.



याप्रकरणी त्यांनी शहर ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा नोंदविला.

# कडाक्याच्या थंडीत राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात...

## जनसामान्यांचा युवा नेत्याची डरकाळी...

## ओपनिंगलाच संदीप शेळकेंची तुफान बॅटिंग जिल्ह्यातून कमिशनराज, गुंडाराज संपवायचयं!

## परिवर्तन रथयात्रेला नळकुंडमधून दिमाखात सुरुवात...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात आता नेते राहिले नाहीत, ते आता ठेकेदारांचे म्होरके झालेत..नेते जनतेला भेटत नाहीत, जनतेसाठी त्यांच्याकडे वेळ नाही पण ठेकेदारांसोबत त्यांच्या बैठकी असतात, ५ - १० टक्के कमिशन सोडा आता तर कमिशनची टक्केदारी वाढलीच आहे, त्याहीपुढे जाऊन लोकप्रतिनिधी आता ठेकेदारीत भागीदारी करीत आहे. आपण त्यांना निवडून दिले पण जिल्ह्यात आता गुंडाराज सुरू आहे.जिल्ह्यातील गुंडाराज आणि कमिशनराज संपवण्यासाठी परिवर्तनाची गरज आहे असा घणाघात संदीप शेळकेंनी केला. वन बुलडाणा मिशनची परिवर्तन रथयात्रेला आज,१० फेब्रुवारीला सकाळी मोताळा तालुक्यातील नळकुंड गावातून सुरुवात झाली. रथयात्रेच्या ओपनिंगलाच संदीप शेळके यांनी आपल्या भाषणातून तुफान बॅटिंग केली..

नळकुंड येथील आदिशक्ती जगदंबा माता, संत सेवालाल महाराज, संत रामराव महाराज मंदिरात दर्शन घेऊन संदीप शेळके यांनी परिवर्तन रथयात्रेचा शुभारंभ केला. त्याआधी गावातील रस्त्यांवर रांगोळी करून, फटाके फोडून संदीप शेळके यांचे दिमाखात स्वागत करण्यात आले. यावेळी शास्त्री महाराज, नळकुंड चे सरपंच डिगांबर चव्हाण, जवानसिंग साबळे, विश्वनाथ पाटील, मधुकर पाटील, भीमराव चव्हाण , संजय शिंगणे यांच्यासह गावकऱ्यांची हजारोच्या संख्येने उपस्थिती होती.. वन बुलडाणा मिशनचा लढा हा परिवर्तनाचा लढा आहे. स्वातंत्र्याची ७५ वर्षे होऊनही बुलडाणा जिल्हा विकासापासून कोसो दूर आहे. बुलडाणा जिल्ह्याची ओळख मागासलेला जिल्हा आहे, कुणी आमच्या जिल्ह्याला मागासलेला म्हणत तेव्हा आमच्या मनाला प्रचंड वेदना होतात. जिल्ह्याला वनसंपदा लाभली आहे, जिल्ह्याला ऐतिहासिक, धार्मिक असा गौरवशाली वारसा आहे. मात्र एवढे असून जिल्हा विकासापासून कोसो दूर आहे. त्यामुळे जिल्ह्याला विकासाच्या बाबतीत मॉडेल करण्यासाठी हा परिवर्तनाचा लढा असल्याचे संदीप शेळके म्हणाले. जिल्ह्यातील तरुणांना रोजगार मिळवण्यासाठी पुण्या मुंबईला जावं लागत त्यामुळे जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात एमआयडीसी उभारने हे आपल्या अंजेड्यावर आहे असे ते म्हणाले.जिल्ह्यात ३०० ते ४०० सिव्हील इंजिनियर बेरोजगार आहे, त्यांना कामे मिळत नाहीत. ठेकेदारी हवी असेल तर त्यांना कमिशन द्यावं लागत..मला जर



लोकांनी लोकसभेत पाठवल तर जिल्ह्यातील पहिले कमिशनखोरी बंद करण्याचा शब्द तुम्हाला देतो,असे संदीप शेळके यावेळी म्हणाले. परिवर्तन रथयात्रेला नळकुंड गावातूनच सुरुवात का केली, याबद्दल बोलताना संदीप शेळके म्हणाले की, फक्त शहर चकाचक झाली म्हणजे विकास होत नाही. गावखेड्यात देखील माणसं राहतात. नळकुंड परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहे, मात्र इथला समाज विकासापासून वंचित आहे. गाव खेड्यांपर्यंत विकास पोहचला पाहिजे, शोषित ,वंचित घटकापर्यंत विकास पोहचला पाहिजे असे संदीप शेळके म्हणाले..

## छतावरील सौर ऊर्जानिर्मितीतून ग्राहकांचे वीजबिल होऊ शकते शुन्य - जिल्हाधिकारी किरण पाटील

जनसंचनल/बुलडाणा

महावितरणच्या रूफ टॉप योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील दोन हजार वीस वीज ग्राहकांच्या छतावर वीज निर्मिती होत असल्याने त्या वीज ग्राहकांना वीजबिल शुन्यापर्यंत कमी करणे शक्य झाले आहे. जिल्ह्यातील इतर ग्राहकांनी महावितरणच्या रूफ टॉप सोलार योजनेत सहभागी होऊन घराच्या छतावर वीज निर्मिती करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी केले आहे. सौर ऊर्जा ही स्वच्छ आणि प्रदुषण विरहीत ऊर्जेच्या उत्तम स्त्रोत आहे. शिवाय रूफ टॉप सोलर योजनेत ग्राहकांना केंद्र सरकारकडून मोठे अनुदान मिळते. तीन किलोवॅटपर्यंत क्षमतेचे पॅनेल बसविण्यासाठी सुमारे १ लाख ५७ हजार खर्च येतो व त्यामध्ये अंदाजे ५४,००० रुपये म्हणजे चाळीस टक्के अनुदान मिळते. त्यामुळे ग्राहकाला जवळपास १ लाख ३ हजार रुपये खर्च येतो. सौरऊर्जेतून निर्माण होणाऱ्या वीजेमुळे ग्राहकाला नेहमीचा वीजपुरवठा कमी वापरावा लागतो व वीजबिलात कपात होते. ग्राहकाच्या सौर पॅनेलमधून त्याच्या वापरापेक्षा जास्त वीज निर्माण झाली तर ती महावितरणच्या ग्रीडमध्ये पाठवली जाते व कंपनी त्या विजेच्या मोबदल्यात वीजबिलात सवलत देते. यातून कधी कधी ग्राहकांना शून्य रकमेचे वीजबिलही येते. सोलर पॅनेल बसविण्याचा खर्च चार ते पाच वर्षांत भरून निघतो पण त्यांचा उपयोग पंचवीस वर्षे होत राहतो. सौर ऊर्जा निर्मितीसाठी ग्राहकांनी ३ किलोवॅट ते दहा किलोवॅट क्षमतेचे पॅनेल्स बसविले तर वीस टक्के अनुदान मिळते. घरगुती ग्राहकांना सुविधा हे या योजनेचे मुख्य उद्दीष्ट आहे. तथापि औद्योगिक ग्राहकही रुफ टॉप सोलर पद्धतीने वीजनिर्मिती करत आहेत. सौर ऊर्जानिर्मितीसाठी पॅनेल बसवू इच्छिणाऱ्या ग्राहकांना महावितरणच्या ./ या वेबसाईटवर जाऊन अर्ज करायचा असतो. पॅनेल बसविणाऱ्या एजन्सीसह सर्व बाबतीत महावितरणची मदत मिळते. सौर ऊर्जेमुळे पर्यावरण रक्षणाला मदत होते तसेच ग्राहकांना आर्थिक लाभ होतो. सुर्योदय योजनेत छतावर रूफ टॉप सोलर बसविण्यासाठी कोणत्याही बँकेकडून हप्त्यावर () कर्ज उपलब्ध होऊ शकते. रूफ टॉप सोलर बसविल्यामुळे शुन्य होणारे वीज बिलाचे पैसे ग्राहक बँकेचे घेतलेले कर्ज फेडण्यासाठी वापरू शकते. त्यामुळे ग्राहकांना अधिक सुलभरीतने आर्थिक भुर्दंडाविना रूफ टॉप सोलर बसविता येऊ शकते.घरगुती बिलात मोठी बचत, घरगुती ग्राहक, गृहनिर्माण रहिवाशी संस्था व निवासी कल्याणकारी संघटनांना योजनेचा लाभ, १ ते ३ किलोवॅट पर्यंत ४० टक्के अनुदान, ३ किलोवॅटपेक्षा अधिक ते १० किलोवॅट पर्यंत २० टक्के अनुदान, सामूहिक वापरासाठी ५०० किलोवॅट पर्यंत परंतु प्रत्येक घरासाठी १० किलोवॅट मर्यादेसह निवासी गृहनिर्माण संस्था या ग्राहकांना २० टक्के अनुदान, शिल्लक वीज महावितरण प्रति युनिट प्रमाणे विकत घेणार

## पत्रकार निखिल वागळे यांच्यावर जिवघेना हल्ला करणाऱ्या समाजकंटकांना जेरबंद करून तत्काळ कारवाई करा

जनसंचलन/ नांदुरा



दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी पुणे येथे सायंकाळी निर्भय बनो या कार्यक्रमात जात असताना जेष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जीवघेणा हल्ला केला.वागळे ज्या कार मधे बसले होते त्या कारवार सलग तीनवेळा दगडफेक,शाईफेक व अंडे फेकून कारची तोडफोड केली.यात गाडीतील काही जण जखमी झाले.आपले मत मांडण्याचा प्रत्येक भारतीयाला लोकशाहीने अधिकार दिला आहे.पण लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारांना जर आपलं मत मांडण्यापासून रोखण्यासाठी जीवघेणे हल्ले होत असतील तर भारतात लोकशाही जिवंत आहे काय हा ही संशोधनाचा विषय आहे.तरी या झालेल्या हल्ल्याचा आम्ही पत्रकार संघाच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करतो व संबंधित दोषींवर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करावी अशी मागणी स्वराज्य बहुउद्देशिय पत्रकार संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे.यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष अमर रमेश पाटील,कोषाध्यक्ष योगेश धोटे,हरिभाऊ जुमडे,देवेंद्र जयस्वाल,नजीर रजवी,सचिव प्रफुल्ल बिचारे,प्रकाश खंडागळे,पुंडलिक काळे,भागवत पेठकर,मनोज धोटे ,दिनकर पाटील उपस्थित होते.